# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः03.06.2025** **वारःमंगळवार**

---

आकाशवाणी. विजयालक्ष्मी साळवी आपल्याला बातम्या देत आहे.

•भारत जगातलं वेगानं विकसित होणारं तिसरं मोठं हवाई क्षेत्र असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन,
•पॅराग्वेचे राष्ट्राध्यक्ष आणि राष्ट्रपती मूर्मू यांची भेट, उभय देशांदरम्यान प्रतिनिधी मंडळ पातळीवर चर्चा
•वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल तीन दिवसांच्या फ्रान्स दौऱ्यावर
•आयपीएल क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि पंजाब किंग्ज यांच्यात आज लढत.
आणि
•देशाच्या विविध भागात आज मुसळधार पावसाचा इशारा; आसाममध्ये पूरस्थिती गंभीर

**<u>मोदी</u>**

भारत जागतिक अवकाश आणि हवाई वाहतूक उद्योग एकत्रीकरणात एक जागतिक नेतृत्व म्हणून उदयास येत आहे. त्यामुळे जागतिक हवाई वाहतूक उद्योगात भारताचं महत्त्व वाढलं आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवी दिल्लीतील भारत मंडपम इथं IATA अर्थात आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक संघटनेच्या 81 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते काल बोलत होते.
देशातील हवाई वाहतूक क्षेत्रानं गेल्या दशकात ऐतिहासिक प्रगती केली आहे, असं सांगत मोदी यांनी जागतिक हवाई वाहतूक तंत्रात भारताची भूमिका अधोरेखित केली. भारत हवाई वाहतूक क्षेत्राला एका उंचीवर पोहोचवण्यासाठी सिद्ध आहे, असं ही मोदी म्हणाले.
'उडान' योजना ही भारताच्या हवाई वाहतूक क्षेत्रातलं सुवर्णपान असून देशांतर्गत विमान वाहतूक क्षेत्रात भारताने जगात तिसऱ्या क्रमांकावर झेप घेतल्याचं त्यांनी सांगितलं. पुढच्या पाच वर्षात देशात 50 विमानतळ विकसित करणार असल्याची घोषणा यावेळी नागरी विमान वाहतूक मंत्री के राममोहन नायडू यांनी केली. यावर्षीच्या एप्रिल महिन्यापर्यंत देशांतर्गत विमान वाहतुकीत 10 टक्के वाढ झाल्याचं नायडू यांनी सांगितलं.

**<u>पॅराग्वे राष्ट्रपति</u>**

पॅराग्वेचे राष्ट्राध्यक्ष सँटियागो पोना पॅलासिओस तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर असून काल त्यांनी राष्ट्रपती द्रौपदी मूर्मु यांची भेट घेतली. पॅलासिओस यांचं स्वागत करताना, उभय देशांमधील संबंध सौहार्दपूर्ण आणि मैत्रीपूर्ण असल्याचं मुर्मू म्हणाल्या. जागतिक महत्त्वाच्या मुद्द्यांवर संयुक्त राष्ट्र संघटनेसारख्या बहुपक्षीय मंचांमध्ये भारताच्या भूमिकेला सातत्यपूर्ण पाठिंबा दिल्याबद्दल राष्ट्रपतींनी पॅराग्वेचे कौतुक केले. पहलगाम हल्ल्यानंतर दहशतवादाचा

तीव्र निषेध आणि एकतेच्या संदेशाबद्दलही त्यांनी पॅराग्वे सरकारचे आभार मानले. पॅराग्वेच्या राष्ट्राध्यक्षांच्या भेटीमुळे उभय देशांत गुंतवणुकीची नवीन क्षेत्रे विकसित होण्यास मदत होईल असंही त्या म्हणाल्या.
दरम्यान, पॅराग्वेचे राष्ट्राध्यक्ष आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दरम्यान काल प्रतिनिधी मंडळ पातळीवर झालेल्या चर्चेत स्वच्छ ऊर्जा, हरित हायड्रोजन आणि जैवइंधन यांसारख्या क्षेत्रात दोन्ही देशांचे संबंध भक्कम करण्याचा निर्णय घेतला आहे. तसंच सायबर गुन्हेगारी, संघटित गुन्हेगारी, अमली पदार्थ तस्करी या मुद्यांवर मात करण्यासाठी परस्पर देशांनी वचनबद्ध असल्याचं म्हटलं आहे. दहशतवादाविरोधातल्या लढाईत उभय देश एकजूट असल्याचं पंतप्रधान यावेळी म्हणाले.

**अमितशहाप्राथमिककृषीपत**

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी काल दिल्लीत झालेल्या सहकारी अन्नधान्य साठवणूक योजनेच्या आढावा बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवलं. या बैठकीला संबोधित करताना ते म्हणाले की, अन्नधान्य साठवणूक योजना ही पंतप्रधानांच्या सहकार से समृद्धी हे स्वप्न साकारण्याच्या दिशेने टाकलेले मोठे पाऊल आहे. प्राथमिक कृषी पतसंस्थांचे उत्पन्न वाढवणे तसंच ग्रामीण रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचा या योजनेचा उद्देश आहे असल्याचं ते म्हणाले. प्रादेशिक गरजांनुसार योजनेची अंमलबजावणी सुरळीतपणे व्हावी यासाठी अन्न आणि सार्वजनिक वितरण विभाग आणि भारतीय अन्नधान्य मंडळाला देशभरातील धान्य गोदामांचे राष्ट्रीय स्तरावर सर्वेक्षण करण्याचे निर्देश त्यांनी दिले. या बैठकीला सहकार राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ आणि कृष्णपाल गुर्जर उपस्थित होते.

**पीकअहवाल**

देशभरात उन्हाळी पिकांच्या पेरणीत लक्षणीय वाढ झाल्याची माहिती कृषी मंत्रालयानं दिली आहे. साधारणपणे 84 लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली असून ती गेल्या वर्षीच्या तुलनेत सव्वा नऊ लाख हेक्टरने अधिक आहे. मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात भाताच्या लगावडीच्या क्षेत्रात जवळपास पाच लाख हेक्टरची वाढ झाल्याचे तसंच हरभरा डाळ, उडीद, श्रीधान्य, तेलबिया तसंच मका आणि भुईमूग यांच्या पेरणी क्षेत्रातही लक्षणीय वृद्धी झाल्याचे नमूद करण्यात आलं आहे.

**गोयलफ्रान्स**

वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल तीन दिवसांच्या फ्रान्स दौऱ्यावर रवाना झाले आहेत. जागतिक व्यापार संघटनेच्या मंत्रीस्तरीय बैठकीला ते आज उपस्थित राहाणार आहेत. पॅरिसमध्ये काल त्यांनी जागतिक स्तरावरील आघाडीच्या उद्योगांच्या मुख्याधिकाऱ्यांची भेट घेतली. भारतीय बाजारपेठेसाठी इलेक्ट्रीक वाहने आणि अक्षय ऊर्जा यांसारख्या क्षेत्रांसाठी गुंतवणूक योजनांविषयी जाणून घेण्याच्या दृष्टीने ही भेट झाली. आपल्या तीन दिवसांच्या दौऱ्यात गोयल, फ्रान्सचे वित्त आणि उद्योग मंत्री एरिक लोम्बार्ड आणि व्यापार मंत्री लॉरेंट सेंट मार्टिन यांच्यासमवेत द्वीपक्षीय बैठक घेणार आहेत.

**साऊथकोरियानिवडणूक**

दक्षिण कोरियामध्ये नव्या राष्ट्राध्यक्षांच्या निवडीसाठी मतदान सुरू आहे. यून सुक येओल यांना लष्करी राजवट लागू केल्यामुळे पदच्युत करण्यात आलं होतं. या निवडणुकीत उदारमतवादी ली जे म्युंग बाजी मारण्याची शक्यता असल्याचे संकेत स्थानिक पाहाणीत दिसून आले आहेत.

**एटीएस**

महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकानं काल ठाणे जिल्ह्यात 22 ठिकाणी छापेमारी करून 12 संशयितांना ताब्यात घेतलं आहे. 2003 च्या मुंबई सेंट्रल आणि मुलुंड बॉम्बस्फोट प्रकरणातला आरोपी, सिमी या बंदी घातलेल्या संघटनेचा माजी सदस्य साकिब नाचण याच्यासह सिमीच्या काही माजी सदस्यांच्या घरांची आणि परिसराची एटीएसनं झडती घेतली आणि पुढील तपासासाठी 12 जणांना ताब्यात घेतलं.

**नीट**

वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी येत्या 15 तारखेला होणारी नीट परीक्षा पुढं ढकलण्यात आली आहे. राष्ट्रीय आयुर्विज्ञान परीक्षा मंडळानं याबाबत प्रसिद्धीपत्रक जारी केलं आहे. जास्तीची परीक्षा केंद्रं आणि पायाभूत सुविधांची व्यवस्था करण्यासाठी परीक्षा पुढं ढकलण्यात आली असून परीक्षेची नवी तारीख लवकरच जाहीर केली जाईल, असं या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

**माओवादी**

छत्तीसगडमधे सुकमा जिल्ह्यात 16 माओवाद्यांनी काल पोलीस आणि केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या अधिकाऱ्यांपुढं आत्मसमर्पण केलं. यापैकी 6 जणांवर 25 लाख रुपयांचं बक्षीस जाहीर करण्यात आलं होतं.

**दर्शन**

भारतातून व्हिएतनाममध्ये पाठविण्यात आलेल्याल भगवान बुद्धाच्या पवित्र अस्थींचं पूजन करण्यासाठी सतरा दशलक्षपेक्षा अधिक भक्तांनी तिथं भेट दिल्याचं केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयानं म्हटलं आहे. बुद्धवादी आणि आध्यात्मिक साधकांनी बौद्ध स्थानांना भेटी देत, एकात्मतेचा धागा अधिक बळकट केल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे. भगवान बुद्धांच्या अस्थी विशेष विमानाने भारतात परत आणण्यात येत आहेत.

**गुकेशबुद्धिबळ**

विश्वविजेता डी गुकेशने नॉर्वे बुद्धिबळ 2025 स्पर्धेच्या काल रात्री झालेल्या सातव्या फेरीत, ग्रँडमास्टर अर्जुन एरिगाईसीवर विजय मिळवला. अचूक चाली आणि भक्कम बचाव याच्या जोरावर गुकेशने हा विजय मिळवला. तत्पुर्वी गुकेशने जागतिक क्रमवारीतला अव्वल मॅग्नस कार्लसनला रविवारी पराभूत केलं होतं. कार्लसनवर मिळवलेल्या विजयासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी गुकेशचं अभिनंदन केलं आहे.

**आय पी एल**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि पंजाब किंग्ज यांच्यात अहमदाबाद इथं अंतिम सामना होणार आहे. 2008 मध्ये सुरू झालेल्या आयपीएल क्रिकेट स्पर्धेत हे दोन्ही संघ एकदाही करंडक जिंकू शकलेले नाहीत. त्यामुळे दोन्ही संघांसाठी हा विजय महत्त्वाचा ठरणार आहे.

**हवामान**

देशाच्या ईशान्येकडील राज्यांमध्ये आज मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. दिल्ली पंजाब हरियाणासह अन्य काही भागातही आज मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**आसामपूर**

दरम्यान आसाममध्ये पूरस्थिती गंभीर असून राज्याच्या अनेक भागात पाण्याची पातळी वाढत आहे. 22 जिल्ह्यातील पांच लाखांहून अधिक लोकांना पुराचा फटका बसला आहे. साडे बारा हजारांपेक्षा जास्त पीक क्षेत्राचे नुकसान झाले आहे. मुख्यमंत्री हिमंत बिस्व सरमा यांनी काल लखीमपूर जिल्ह्याला भेट देऊन पूर परिस्थितीचा आढावा घेतला. आसाम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात पूर आणि भूस्खलनामुळे 10 जणांचा मृत्यू झाला आहे. राज्य सरकारने सर्व पूरग्रस्त जिल्ह्यांमध्ये 52 मदत छावण्या आणि 103 मदत वितरण केंद्रे उघडली आहेत. बचाव आणि मदत कार्यासाठी एसडीआरएफ पथके देखील तैनात करण्यात आली आहेत.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**